**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

# वेबसाईट वरील नोटीस खालील प्रमाणे.

**एसएनडीटी महिला विद्यापीठ, पुणे आवार, पुणे येथे जाहिरात फलक करार पद्धतीने देण्यासाठी प्रस्ताव मागवणे बाबत.**

एसएनडीटी महिला विद्यापीठ, पुणे आवार, पुणे च्या आवारात जाहिरात फलक करार पद्धतीने द्यावयाचे संस्थेच्या विचाराधीन आहे. संबंधित ठिकाणी जाहिरात फलक करार पद्धतीने देण्यासाठी कंत्राटदारांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

करार पद्धतीने देण्यात येणाऱ्या जाहिरात फलकांचा प्रस्ताव बाबतचा सर्व तपशील, नियम व अटी या https://www.sndt.ac.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

निविदा भरणाऱ्या जाहिरात संस्थेकडून एक तांत्रिक लिफाफा व दुसरा आर्थिक लिफाफा दोन्ही लिफाफे एका पाकिटात घालून संस्थे मध्ये दिनांक १०/०१/२०२५ पूर्वी ०५.३५ कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत जमा करण्यात यावे.

**प्रस्तावा बाबत तपशील, नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१) एसएनडीटी महिला विद्यापीठ, पुणे आवार, पुणे येथील आवारात जाहिरात फलक करार पद्धतीने देण्यासाठी परवानगी देणेबाबत विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. संबंधित ठिकाणी जाहिरात फलक करार पद्धतीने देण्यासाठी कंत्राटदाराकडून जास्तीत जास्त ५ वर्ष कालावधीसाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत.

२) एसएनडीटी कडे उपरोक्त प्रस्ताव देण्याची अंतिम तारीख १०/०१/२०२५ पूर्वी ०५.३५ कार्यालयाच्या वेळेत SNDTWU Mumbai , येथील संस्था कार्यालयामध्ये सीलबंद लखोट्यात त्या मध्ये एक 'तांत्रिक लिफाफा" व दुसरा "आर्थिक लिफाफा" असे स्पष्ट लिहून दोन्ही स्वतंत्र लिफाफे एका पाकिटात घालून त्यावर "जाहिरात फलका बाबत प्रस्ताव " असे मोठ्या अक्षरात सही शिक्क्यांसहित संपूर्ण प्रस्ताव सादर करावेत.

२अ) 'तांत्रिक लिफाफा" मध्ये कागदपत्रांसोबत जाहिरात संस्थेचे पॅन कार्ड, जाहिरात संस्थेचे शॉप ॲक्ट, GST नंबर ,संस्थेचे मागील पाच वर्षापैकी तीन वर्षात कमीत कमी ०१ करोड रुपये दर वर्षीच्या Turn Over बाबतची कागदपत्रे व अन्य आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडावित .

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in



२ब)"आर्थिक लिफाफा"मध्ये करार पद्धतीने देण्यात येणाऱ्या जाहिराती फलकांची नकाशासह जागा , जाहिरात फलकाचे आकारमान (जास्तीत जास्त २० x २५ फूट ), वार्षिक शुल्क , शुल्कवाढ, जीएसटी टॅक्सेस बाबत सर्व तपशीलवार माहिती स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे.

३) प्रस्ताव भरणाऱ्या संस्थेचा जाहिरात फलकाच्या व्यवसायामध्ये कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

४) प्रस्ताव भरणाऱ्या संस्थेचा मागील दहा वर्षामध्ये कमीत कमी पाच वर्षासाठी महाराष्ट्र राज्यशासन Panel of Advertising Agency मध्ये समावेश असणे आवश्यक आहे .

५) स्थानिक मान्यवर शैक्षणिक संस्थांमध्ये जाहिरात फलक उभारण्याचा कमीत कमी पाच वर्षे व त्यापेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असणाऱ्या जाहिरात संस्थांना प्राधान्य दिले जाईल.

६) एसएनडीटी विद्यापीठाला मान्य असणाऱ्या जागेवरती जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी दिली जाईल. एकूण तीन ठिकाणी ५*५ सदरचे फलक विद्यापीठाने मान्य केलेल्या ठिकाणी जास्तीत जास्त ५० फूट उंचीवर व ५०० स्के. फूट आकाराचे फलक लावत येईल.

७) जाहिरात फलक उभारणीसाठी आवश्यकता असणाऱ्या सर्व विभागाच्या मान्यता, परवानग्या संबंधित जाहिरात संस्थेने घ्यायच्या आहेत. पुणे मनपा आकाश चिन्ह फी किंवा अन्य सर्व चलने, भरणा रक्कम ही संबंधित जाहिरात संस्थेने भरायची आहेत. जाहिरात फलक उभारताना आवश्यक असणारी स्ट्रक्चरल मान्यता त्याचप्रमाणे त्याची दक्षता ही संबंधिताची आहे. व त्याची पूर्वपरवानगी विद्यापीठाकडून घेणे बंधनकारक राहील.

- सदरच्या फलकावर जो मजकूर छापला जाईल त्या मजकुरशी विद्यापीठाच्या कोणत्याही प्रकारचा संबध असणार नाही वा विद्यापीठ जबाबदार असणार नाही.
- सदर फलक बसवण्यापासून ते काढण्यापर्यंत कोणताही आर्थिक अथवा इतर खर्च विद्यापीठ करणार नाही.
- सदर कराराचा वार्षिक देखभाल दरावर दर एक वर्षानंतर १०% वाढ करण्यात येईल .
- सदर करार विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टीने जाहिरात फलक काढण्याचे झालेस तो आवश्यकतेनुसार सुधारित ठिकाणी बसवण्याची जबाबदारी संबंधीताची राहील.

SNDT Women's University
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in



- सदर फलकावर कोणताही मजकुर आक्षेपार्हअसल्यास तात्काळ करार रद्द करण्याचा हक्क विद्यापीठाचा असेल. तसेच कोणताही अपघात अथवा जीवित हाणी झालेस याची संपूर्ण जबाबदारी संबंधिताची राहील.
- MSEDCL मिटर विद्यापीठामार्फत स्वतंत्र मिटर घेऊन त्याचे डिपॉझिट व सर्व बिले भरण्याची जबाबदारी जाहिरात संस्थेची राहील, पण सदरचे मिटर हे विद्यापीठाच्या नावावर राहील.

८) एसएनडीटी विद्यापीठाला ठराविक कालावधी करता जाहिरात करण्यासाठी सदर फलक विनामूल्य उपलब्ध केला जाईल. एका वर्षातून ६ वेळा सलग ५ दिवस म्हणजेच तो कालावधी ३०दिवसांपेक्षा जास्त दिवस नसेल.

९) संस्थेकडे प्राप्त झालेल्या सर्व जाहिरात संस्थेच्या किंवा कोणा एका जाहिरात संस्थेचा प्रस्ताव/ निविदा नाकारण्याचा किंवा संपूर्ण प्रस्ताव /निविदा प्रक्रिया थांबवण्याचा, किंवा कोणा एका जाहिरात संस्थेला प्रस्ताव/ निविदा बहाल करण्याचा हक्क एसएनडीटी संस्थेने राखून ठेवला आहे.

१०) जाहिरात संस्थेने दिलेल्या प्रस्तावा मधील जाहिरात फलकाची ठिकाणे रद्द करण्याचा, कोणतेही कारण न देता संपूर्ण प्रस्ताव नाकारण्याचा पूर्ण हक्क एसएनडीटी संस्थेने ने स्वतःकडे राखून ठेवला आहे. त्याचप्रमाणे गरजेनुसार अटी व नियमांमध्ये आवश्यक ते सर्व बदल करण्याचा पूर्ण हक्क SNDTWUराखून ठेवला आहे.

११) SNDTWU शी निगडित असलेल्या कोणतीही व्यावसायिक संस्था, एसएनडीटी संस्थेवर कार्यरत असणारे सभासद, नोकरदार, प्राध्यापक यांना प्रस्ताव / निविदा भरता येणार नाही.

१२) अंतिम वेळ व तारखेनंतर येणाऱ्या प्रस्ताव / निविदा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**आदेशावरून**

**कुलसचिव**
**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई**